महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ५३ वे दिनांक : १३/०२/२०२६ वार : शुक्रवार

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी ७६५ कोटी रुपयांची वाढीव मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** विकास कामे करतांना ती त्या त्या क्षेत्रानुसार समायोजित करावीत जेणे करुन कामांचे नियोजन करणे सुलभ होऊन अनेक कामे क्षेत्रात करता येतील, असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले. जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडली.

बैठकीच्या प्रारंभी दिवंगत अजित पवार यांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या जिल्ह्यातील भेटींवर आधारीत जिल्हा माहिती कार्यालयाने केलेली चित्रफित दाखवून व दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ७३५ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना करीता १०४ कोटी रुपये तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना १० कोटी ४६ लक्ष रुपये असा एकूण ८४९ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. या निधीच्या खर्चाचा आढावा यावेळी पालकमंत्र्यांनी घेतला.

सन २०२६-२७ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता वित्तीय मर्यादा ५२६ कोटी ८३ लक्ष रुपये इतकी होती. यंत्रणांनी प्रत्यक्षात २०३१ कोटी ९७ लक्ष रुपयांची मागणी केली असून १५०० कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा आहे. सन २०२५-२६ च्या तुलनेत सन २०२६-२७ साठी ७६५ कोटी रुपयांची वाढीव मागणी करण्यात आली. त्यास समितीची मान्यता देण्यात आली. आमदार प्रशांत बंब यांनी शालेय शिक्षणाचा खालावत चाललेला दर्जा सुधारण्यासाठी शिक्षण विभागाने केलेल्या प्रयत्नांचा अहवाल मागणी केला होता. समिती समोर सादर झालेला अहवाल हा वस्तुनिष्ठ नसल्याने शिक्षणाधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या कारवाईसह अहवाल सादर करावा. त्यासाठी वाढीव मुदत द्यावी,असे सांगितले. पालकमंत्री शिरसाट यांनी या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ बैठक घेऊन अहवाल सादर करावा,असे निर्देश दिले.

आमदार रमेश बोरनारे यांनी ग्रामिण भागात विद्युत रोहित्र निकामी होण्याचे प्रमाण वाढत चालले असून त्यासाठी जादा निधी द्यावा अशी मागणी केली. तर आमदार भुमरे यांनी क्षेत्रनिहाय प्राप्त रोहित्र व त्याचे वितरण याचा अहवाल वीज वितरण कंपनीने सादर करावा, अशी मागणी केली. तसेच निरंतर योजनेचा अहवालही सादर करावा अशी मागणी केली. तसेच पैठण शहरात आलेल्या महापुरात निकामी झालेले रोहित्र तातडीने बदलून मिळावे अशी मागणी केली. मंत्री अतुल सावे यांनी शासकीय इमारतींचे सौरीकरण करावयाचे असल्याने त्या कामासाठी जादा निधी शिल्लक ठेवावा असे निर्देश दिले. आमदार अनुराधा चव्हाण यांनी आरोग्य योजनांच्या अंमलबजावणी बाबत प्रश्न उपस्थित केला. प्रत्येक विधानसभा क्षेत्र ॲनिमियामुक्त करण्याचा उपक्रम राबवावा, अशी मागणी केली. सादरीकरण जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन भारत वायाळ यांनी केले.

## घातपात असेल तर सिद्ध होईल:अजित पवारांच्या अपघातावर नाना पाटेकर



**मुंबई :** हा घातपात असेल तर ते सिद्ध होईल आणि सिद्ध झाले तर दोषींना शिक्षा मिळेल. तसेच अजित पवारांच्या अपघातासंबधित प्रश्न उपस्थित केले जात असतील तर त्याचे निराकरण देखील व्हायला हवे, अशी प्रतिक्रिया अभिनेते नाना पाटेकर यांनी दिली आहे. रोहित पवारांनी उपस्थित केलेल्या शंकांवर प्रश्न विचारला असता, ते म्हणाले, रोहित पवारांनी काकांना गमावले आहे. त्यांच्या मनात जे काही प्रश्न असतील ते त्यांनी उपस्थित केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची भेट घेतल्यानंतर नाना पाटेकरांनी माध्यमांशी संवाद साधला.

नाना पाटेकर म्हणाले, अजित पवार माझ्या लहान भावासारखे होते, चांगले मित्र होते. मी त्यांना नेहमी मिस करेन. तसेच सुनेत्रा पवार यांचे दु:ख इतरांपेक्षा वेगळे आहे. ते त्यांनाच सहन करावे लागेल. पण, त्यांनी जो पदभार स्वीकारला आहे त्याची जबाबदारी देखील सांभाळावी लागेल आणि ती जबाबदारी त्या सांभाळतील, पण वेळ तर लागेलच.

आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या अपघाताबाबत विविध प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच हा घातपात असल्याचा संशय देखील त्यांनी व्यक्त केला आहे. यावर बोलताना नाना पाटेकर म्हणाले, रोहित पवारांनी काकांना गमावले आहे. त्यांच्या मनात जे काही प्रश्न असतील ते त्यांनी उपस्थित केले. आणि हा घातपात असेल तर ते सिद्ध होईल आणि सिद्ध झाले तर दोषींना शिक्षा मिळेल. तसेच अजित पवारांच्या अपघातासंदर्भात प्रश्न उपस्थित केले जात असतील तर त्याचे निराकरण देखील व्हायला हवे, असे मत पाटेकर यांनी व्यक्त केले आहे.

पुढे बोलताना नाना पाटेकर म्हणाले, अजित पवार 19-20 वर्षांचे होते तेव्हापासून माझी त्यांची मैत्री होती. कार्यकर्ता म्हणून काम करत होते तेव्हापासून मी त्यांना ओळखतो. जिथून त्यांनी सुरुवात केली आणि ज्या पदापर्यंत झेप घेतली तो प्रवास कमालीचा होता. राजकीय सोडून द्या, पण त्यांना नेहमी मिस करेन. माझ्या छोट्या भावासारखे होते अजित पवार, चांगले मित्र होते, अशी भावना पाटेकर यांनी व्यक्त केली.

## स्वीकृत सदस्यांसाठी भाजपमध्ये ५ जागा, दावेदार १५०, महापालिकेत युद्ध रंगणार




**छत्रपती संभाजीनगर :** महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला मिळालेल्या ऐतिहासिक विजयानंतर आता खऱ्या अर्थाने 'सत्तेच्या गणिताचा दुसरा अध्याय सुरू झाला आहे. पक्षाने निवडणुकीत दिलेली आश्वासने आणि बंडखोरांना शांत करण्यासाठी दाखवलेले स्वीकृत सदस्यपदाचे गाजर आता इच्छुकांसाठी गळ्यातील ताईत बनले आहे. केवळ ५ जागांसाठी १५० इच्छुकांनी अर्ज केल्याने भाजप कार्यालयाबाहेर अर्जदारांची जत्रा भरली आहे. विशेष म्हणजे, या पदासाठी आवश्यक असलेल्या 'स्वयंसेवी संस्थेचे सदस्य असण्याच्या तांत्रिक अटीची पूर्तता करण्यासाठी आता धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात 'चेंज रिपोर्ट'चा महापूर आला आहे. राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी रातोरात 'समाजसेवक' होण्यासाठी इच्छुकांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे.

शंभर सदस्यसंख्या असलेल्या महापालिकेसाठी दहा स्वीकृत नगरसेवकांच्या नियमाचा फायदा छत्रपती संभाजीनगर महापालिकेला मिळत आहे. मनपाचे एकूण ११५ नगरसेवक असल्यामुळे एका स्वीकृत नगरसेवकासाठी ११.५ एवढे मताधिक्य होते. ११.५ निवडून आलेल्या नगरसेवकांचे मतदान मिळालेली व्यक्ती स्वीकृत सदस्य होईल. यासंबंधीच्या प्रक्रियेला दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो. महापालिकेच्या माध्यमातून निवडणुकीची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

महापालिका निवडणुकीत भाजपला ५७ जागा मिळाल्याने त्यांच्या वाट्याला पाच सर्वात जास्त स्वीकृत सदस्य येतात. त्यानंतर ३३ जागा घेणाऱ्या एआयएमआयएमच्या वाट्याला तीन जागा येतील. शिंदेसेनेचे १३ नगरसेवक निवडून आल्याने त्यांच्या वाट्याला एक जागा येईल. उर्वरित नगरसेवकांची गोळाबेरीज करणारा एक स्वीकृत सदस्य होऊ शकतो. इतरांमध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार गट मिळून २ नगरसेवक, उबाठा ६, वंचित बहुजनचे ४ नगरसेवक निवडून आले आहेत. असे दहा नगरसेवक शिल्लक राहतात. या दहांसह दोन अतिरिक्त नगरसेवकांची जुळवाजुळव करणारा यशस्वी झाला तर तो स्वीकृत सदस्य होऊ शकतो.

छाया खाजेकर, अमृता पालोदकर, दिव्या मराठे, हर्षवर्धन कराड, हर्षवर्धन केणेकर, व्यापारी प्रतिनिधी महावीर पाटणी, अजय तलरेजा, कचरू घोडके, मकुंद दामोदरे, दीपक ढाकणे, मयूर बोरसे, गोकुळसिंह मलके, धनंजय कुलकर्णी, यज्ञेश बसैये आदी.

स्वीकृत सदस्य निवडीसाठी प्रदेशाकडून अद्याप दिशानिर्देश आले नाहीत. विभागीय कार्यालयात दीडशे अर्ज प्राप्त झाले आहेत. भाजपच्या वाट्याला केवळ पाच जागा येतील. यासाठी वकील, डॉक्टर, उद्योजक, समाजसेवक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आदी क्षेत्रांतून अर्ज आले. - किशोर शितोळे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर,

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६


## विज्ञानाधिष्टीत दृष्टीकोनातून ग्रामीण विकासात योगदान द्यावे- कृषीतज्ञ डॉ. उदय देवळाणकर



**कन्नड (अरुण थोरात):** शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागामार्फत दाभाडी येथे दि. 12 ते 18 फेब्रुवारी या कालावधीत सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. “शाश्वत विकासासाठी युवक, पडीक जमीन व पाणलोट व्यवस्थापन” या समकालीन व समाजाभिमुख विषयाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी व हवामान तज्ञ डॉ. उदय देवळाणकर उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून मुक्तारभाई शहा, श्रीमती अकिलाबी शहा सरपंच, कचरू शिरसाठ पोलीस पाटील, अनिल शिरसाठ, मधुकर अदिक (उपसरपंच, मौजे दाभाडी), फुलचंद मुंडे (ग्रामविकास अधिकारी, मौजे दाभाडी), अरुण अदिक, बाबुरावजी अदिक, कार्तिकाना दाबके (माजी सरपंच, बहिरगाव), कृषीभूषण पोपटराव दापके, गणपतराव खरे, श्री शिंदे काका आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रस्तावना डॉ. राकेश अहिरराव यांनी मांडली. त्यांनी शिबिराचा उद्देश स्पष्ट करताना युवकांनी पडीक जमिनीचे पुनरुज्जीवन, जलसंधारण, मृदसंवर्धन आणि पाणलोट व्यवस्थापन यामध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले.प्रमुख पाहुणे डॉ. उदय देवळाणकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात, "हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जलव्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी पाणलोट व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, जलसाठवण तंत्र आणि मृदसंवर्धन" या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. युवकांनी विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन स्वीकारून ग्रामीण विकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. विजय भोसले प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय कन्नड यांनी "एन.एस.एस. स्वयंसेवकांनी समाजसेवेच्या माध्यमातून शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारावा, असे प्रतिपादन केले. त्यांनी युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी अशा शिबिरांचे महत्त्व विशद केले". या सात दिवसीय शिबिरामध्ये पडीक जमिनीचे सर्वेक्षण, जलसंधारण जनजागृती, श्रमदान, बंधारे स्वच्छता, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, तसेच पर्यावरण विविध विषयावर व्याख्याने व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.कार्यक्रमाधिकारी म्हणून डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, डॉ. सीमा काशीद यांनी शिबिराचे नियोजन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी के मगर, संयोजन समिती सभासद ग्रंथपाल डॉ. संतोष देशमुख, प्रा. सोमेश्वर मोगरे, प्रा. मदन खुर्दे, प्रा. प्रगती चव्हाण, नानाभाऊ जंजाळ तसेच मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी हुसे, क्रीडा विभाग व एनसीसी प्रमुख डॉ. उदय डोंगरे, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर प्रतिभा अहिरे मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र घोती, वाणिज्य विभागाचे डॉ. मंगेश जाधव तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि एन.एस.एस. स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएसएस स्वयंसेविका जानवी गाडे हिने केले, तर आभार प्रदर्शन एनएसएस स्वयंसेवक यश पाटील यांने केले.या शिबिराच्या माध्यमातून युवकांमध्ये शाश्वत विकासाची जाणीव निर्माण होऊन ग्रामीण भागातील पडीक जमीन व जलस्रोतांच्या संवर्धनासाठी प्रभावी पावले उचलली जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## सामाजिक कार्यातील व्यक्तिमत्त्व विकास व मानवी मूल्यांवरील शॉर्ट टर्म कोर्सचे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाअंतर्गत “सामाजिक कार्यातील व्यक्तिमत्त्व विकास आणि मानवी मूल्ये” या विषयावर शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सचे उद्घाटन संपन्न झाले.या कोर्सचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्मिता अवचार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुनंदा चक्रनारायण उपस्थित होत्या.या कोर्ससाठी मार्गदर्शक म्हणून श्री. मुरलीधर वर्मा व डॉ. प्रतिभा मनवर लाभले असून कार्यक्रमाच्या आयोजक समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. आरती धनवे व डॉ. वैशाली पाटील व्यासपीठावर उपस्थित होत्या.कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता अवचार यांनी पुस्तकात वाचलेल्या ज्ञानासोबत वास्तवातील अनुभवाचे भान असणे गरजेचे असल्याचे सांगितले. आजच्या काळात तरुणांमध्ये नैराश्य व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वतःमधील कमतरता ओळखून सामाजिक जाणीव विकसित करणे, आजूबाजूच्या घडामोडींचे भान ठेवणे आणि संविधान वाचून माणूसपण समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मूल्याधिष्ठित आचरण केल्यास निश्चितच कोर्सचे उद्दिष्ट साध्य होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी विद्यार्थिनींसाठी हा कोर्स किती महत्त्वाचा आहे, हे विशद केले.याप्रसंगी राखी बनविणे स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. स्मिता अवचार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम क्रमांक कु. साक्षी बागडे, द्वितीय क्रमांक कु. कोमल बागडे आणि तृतीय क्रमांक कु. सायली केळकर यांनी पटकावला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आरती धनवे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. सुजाता कणके यांनी करून दिला. कोर्ससाठी लाभलेल्या मार्गदर्शकांचा परिचय कु. अंजली खिराडे व कु. अनुजा काळे यांनी करून दिला. आभारप्रदर्शन डॉ. वैशाली पाटील यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच या कोर्ससाठी सहभागी असणाऱ्या महाविद्यालयातील व इतर महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६


## जागृतीचा घणाघात

दीर्घ धुरकट काळोखातून
एक स्वर आकार घेत गेला,
उपहासांच्या वादळांमध्येही
तो निश्चयाने तेजाळत राहिला.

टवाळकीच्या जखमा सोसत
तो प्रश्न बनून उभा राहिला,
सभागृहाच्या प्रकाशवर्तुळात
असत्याचा बुरखा फाडत गेला.

त्याच्या वाणीतील ज्वाला
दहनासाठी नव्हे कधी—
ती अंत:करणी पेटणारी
जागृतीची शांत दिवटी.

तो सांगतो—
राष्ट्र म्हणजे केवळ सीमा नव्हे,
ते तरुणांच्या स्वप्नांचं आकाश,
शेतकऱ्यांच्या श्रमांचा सुवास.

माहितीच्या या युगधर्मात
सत्यच ठरेल अखेर ठाम,
भ्रमांच्या बाजारात शेवटी
विवेकच मोजेल खरा दाम.

त्याच्या हास्यात व्यंग दडलं,
व्यंगात प्रश्नांची चाहूल,
एका सवालानेच पडतात
सत्तेच्या मौनभिंतींना तडे खोल.

हे युवामना!
प्रतिमांच्या पलीकडचं सत्य
पहा,
गदारोळाच्या गर्दीत हरवू
नका—
विवेकाची मशाल तेवत ठेवा!

लोकशाहीच्या या रणांगणी
प्रश्नच अस्त्र ठरतं,
जागृत नागरिकांच्या पावलांनी
राष्ट्रनिर्माण घडतं.

नेते येतात, नेते जातात,
जनतेचा श्वास चिरंतन—
जागरूकतेच्या दीपस्तंभांनी
उजळेल भारतभुवन.

उठा—बोला—विचारा—
हीच खरी देशभक्ती ठरेल;
जागृत पिढीच भविष्य घडवेल,
आणि सत्तेला उत्तरदायी करेल!

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## गड आपला राख

एक पाऊल पुढे
हिंमतीने तू टाक
सदा संघर्षाने तू
गड आपला राख. १

कलियुगात मित्रा
नित्य सतर्क रहा
जगतांना जगास
डोळे भरून पहा.
२

स्वप्न मनी घेऊन
होऊ नको उदास
सोडू नको प्रयत्न
मन होई भकास. ३

सदा प्रयत्न कर
देण्यासाठी आनंद
मिळणार आनंद
जोपासता स्वच्छंद.

एक पाऊल पुढे
आनंदाने टाकावे
टाकलेला पाऊल
पुढे पुढे चालावे. ५

त्रास होईल तुला
थोड संघर्ष कर
फळ मिळेल
नक्की
रंग कष्टात भर. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## बहिरगाव येथील विश्वमाई वारकरी संस्थेत आजीवन शिक्षण व विस्तार केंद्रातर्फे प्रवचन



**कन्नड (प्रतिनिधी) :** बहिरगाव शिवारातील श्री रेणूकामाता संस्थान अंतर्गत कार्यरत असलेल्या विश्वमाई अध्यात्मिक गुरुकुल या वारकरी संस्थेस आज कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग व मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र यांच्या वतीने आज (ता. १२ ) सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. त्यांना आमच्या महाविद्यालयातील व मराठी विभागाच्या विविध उपक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी ह.भ.प. विष्णू महाराज काळे यांचे प्रवचन संपन्न झाले. बहिरगाव परिसरात या वारकरी संस्थेच्या माध्यमातून वारकरी शिक्षण व शालेय शिक्षण घेणारे ४० विद्यार्थी शिक्षण घेतात. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन शिक्षण व विस्तार केंद्र विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले. या विभागाच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. के. एल. भानुसे, मानसशास्त्रज्ञ व मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. एम. घोती यांची उपस्थिती होती.

## तिसगाव येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत दहावीचा निरोप समारंभ



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** “अशी पाखरे येती आणि स्मृती ठेवूनि जाती”......“निरोपाचा क्षण नाहीशुभेच्छांचा सण आहेपाऊल बाहेर टाकतानारेंगाळत राहणार मन आहे”अतिशय उत्साही पण तितकाच भावनावश असा हा शेवटचा दिवस संपन्न झाला.बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी तिसगावातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेच्या प्रांगणात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता नववी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.या कार्यक्रमादरम्यान कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री विलासजी कटारे हे होते तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मनीषा सानप यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री डिगंबर खालापूरे यांनी केले. त्यानंतर इयत्ता दहावी मध्ये शिकणाऱ्या अनिता उघडे,श्रावणी उघडे,पूजा मोरे,अमृता वाघ, दीपक गावंडे,यश सोनवणे, अविनाश माळी,पवन गांगड यांनी आपले मनोगत व शाळेतील पाच ते सहा वर्षाच्या आठवणी सांगून शिक्षकांप्रती व शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.त्यानंतर श्री दिनेश परदेशी,श्री योगेश ठाकूर,श्री भागवत डोंगरे, श्री रामराजे राठोड,संजय मधे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री विलास जी कटारे सर यांनीही विद्यार्थ्यांना एस.एस.सी. परीक्षेसाठी व भावी आयुष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.त्याचबरोबर विद्यार्थी-विद्यार्थिनींना एस एस सी (बोर्ड) परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.या निरोप समारंभात इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती दिपाली खेडकर यांनी केले त्यानंतर अल्पोपाराने कार्यक्रमाची सांगता झाली.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६

# आठवणी..भ्रमंती पितळखोरा ते पाटणादेवी

**न**वरात्रीच्या पवित्र उत्सवाच्या निमित्ताने आम्ही कालीमठच्या कालिकामातेचे दर्शन घेऊन जगातील पहिली लेणी पाहण्यासाठी पुढे निघालो. साधारणपणे सात-आठ कि. मी. अंतर पार केल्यानंतर पितळखोरा लेणीचे भव्य प्रवेशद्वार स्वागतासाठी उभे होते.तिथून आत प्रवेश करताच वनराईने समृद्ध हिरवा परिसर पाहून खूप आनंद झाला.असं वाटलं की आपण हजारो वर्षे मागे आलो श्रीराम,श्रीकृष्ण अन भगवान बुद्धाच्या युगात.. धकाधकीचा आधुनिक काळ सोडून अन काय माहीत अचानक भर उन्हात गार वाऱ्याची झुळूक अंगाला झोंबली व मनाला अलगद शांती लाभली.थोडं पुढं जाता खाली खोल दरी जणू पाताळच उघडं पडलं असावं असा भास झाला. चोहीकडे उभ्या असलेल्या भव्य डोंगररांगा, विविध प्रकारचे विस्तीर्ण वृक्ष आणि उंचावरून कोसळणारा पाण्याचा भला मोठा धबधबा पाहून स्वर्गात आल्याची अनुभूती झाली. खरं तर यापेक्षा सुंदर निसर्गाचा नजारा जगाच्या पाठीवर कुठेही नसेल, असं मनोमन वाटू लागलं.धबधब्याच्या पाण्याचा खळखळाट कानावर पडत होता. त्या आवाजात एक विलक्षण माधुर्य होतं..जणू निसर्ग स्वतःचं एखादं आवडीचं गीत गात होता. डोंगरांच्या कुशीतून वाहणारा वारा झाडांच्या पानांशी खेळत होता. त्या पानांच्या सळसळीचा नाद आणि धबधब्याच्या पाण्याचा गजर एकत्र येऊन जणू एक निसर्गसंगीत निर्माण होत होतं. काही क्षण आम्ही तिथेच थांबलो. न बोलताही सगळे काही अनुभवत होतो. त्या शांततेत शब्दांची गरजच नव्हती.दरीकडे नजर टाकली की अंगावर रोमांच उभे राहत होते. इतकी खोली की तळ दिसेनासा झाला होता. धुक्याच्या हलक्या पडद्यामधून धबधब्याचे पांढरेशुभ्र पाणी खाली झेपावत होते. त्या थेंबांच्या तुषारांनी आजूबाजूची हवा थंडगार झाली होती. अंगावर येणारे ते तुषार जणू निसर्गाचे आशीर्वादच वाटत होते.डोंगरकड्यांवर उभ्या असलेल्या उंच वृक्षांनी जणू या निसर्गरंगमंचाला हिरवी चौकट दिली होती. काही झाडांच्या फांद्या दरीत झुकल्या होत्या, तर काही आकाशाकडे झेपावत होत्या. त्या वृक्षांच्या पानांतून येणारा सूर्यप्रकाश जमिनीवर वेगवेगळे नक्षीदार सावलीचे पट तयार करत होता. त्या सावल्यांवर चालताना जणू आपण एखाद्या चित्रकाराच्या कॅनव्हासवरून चालत आहोत असा भास होत होता.थोड्या अंतरावर पक्ष्यांचे किलबिलाट सुरू होते. काही रंगीबेरंगी पक्षी फांदीवरून फांदीवर उडत होते. त्यांच्या पंखांच्या हालचालींनी हवेत हलकीशी झुळूक निर्माण होत होती. त्या क्षणी निसर्गाशी एकरूप झाल्याची अनुभूती मिळाली. शहरातील धकाधकीचा, गोंगाटाचा आणि कृत्रिम जीवनाचा विसर पडला. मनात फक्त एकच भावना होती..अवर्णनीय आनंदाची.आमच्या पावलांचा वेग मंदावला. कारण त्या निसर्गरम्य दृश्यातून पुढे जाण्याची इच्छाच होत नव्हती. प्रत्येक क्षण डोळ्यांत साठवून ठेवावा, मनाच्या कॅमेऱ्यात टिपून घ्यावा, अशी ती वेळ होती. खरोखरच, अशा निसर्गाच्या सान्निध्यात माणूस स्वतःला पुन्हा शोधतो. मनावरची सारी धूळ झटकली जाते आणि अंतर्मनात एक नवीन प्रकाश उजळतो. त्या दरीकाठचा तो क्षण आयुष्यभरासाठी आठवणींच्या कोपऱ्यात जतन करून ठेवावा, असाच होता.पायरीने खाली उतरून धबधबा पार करून आम्ही लेण्यात प्रवेश केला.डोंगरात काळ्या दगडात कोरलेल्या जगातील हया पहिल्या लेण्या पाहून हा विश्वास बसेना की माझ्या कन्नडच्या भूमीला इतकं मोठं सांस्कृतिक संचित लाभलं आहे. तिथं लेण्याच्या खांबांवर आज ही भगवान बुद्ध यांचे अस्पष्ट चित्र दिसतात अन असे वाटते की एक दोन वर्षांपूर्वी हे चित्र काढले असेल पण हजारो वर्षांपूर्वी काढलेले हे चित्र आज ही दिसते मग हा रंग आमच्या पूर्वजांनी कुठून आणला असेल असा प्रश्न पडला तर माहिती मिळाली की याच परिसरातील झाडाच्या पानाचा हा रंग आहे .तिथं लेणीच्या समोर घरून आणलेल्या भाकरीवर ताव मारला.जवळच्या काळ्या पाषाणातून झुळझुळ वाहत येणारे पाणी पिऊन पुढं डोंगराच्या कडेकडेने झाडाझुडुपांतून मार्ग काढत पाटणादेवी कडे निघालो.आता घनदाट जंगल असल्यामुळे आम्ही थोडं घाबरलो होतो कारण कुठून एखादा वन्य प्राणी हल्ला करील हे सांगता येत नव्हते पण' इश्क है तो रिस्क है'या उक्तीप्रमाणे या नव्या अनुभवाला सामोरे जात वाटेवरील विविध प्रकारच्या सुंदर वृक्ष वेलींचे, फुलांचे मोबाईलमध्ये फोटो घेत घेत पुढे चाललो होतो.वाटेने साग, धामोडा, हेंकळणी घाणेरी, टेंभुर्णी, पळस, बहाळा, साबर, आंजन, खैर, रानकेळी, तिवस, चंदन इत्यादी झाडाच्या सावलीमुळे उन्हात चालणे शक्य होत होते पण घामामुळे लवकर तहान लागली. त्या घनदाट जंगलात वाटेवर एका ठिकाणी डोंगराच्या कपारीतून पाणी वाहत येताना पाहून पाणी पिण्यासाठी थांबलो तिथं पाणी पिऊन थोडा विसावा घेऊन मराठवाड्याची सीमा ओलांडली अन खान्देश भूमी दिसू लागली...हिरव्या पर्वत रांगेत हरवलेली..घट्ट झाडीमध्ये वरून खाली पाहिले असता दूरवर झाडाच्या मध्ये एक इमारत दिसली अन् कुतूहलाने सोबत चाळीसगांवचे आमचे मित्र प्रशांत अहिरराव दादांना विचारले असता त्यांनी माहिती दिली की इथंच या शांत वनराईत शून्याचा शोध लावणाऱ्या प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांनी 'लीलावती' ग्रंथ लिहिला असून अनेक वर्षे साधना करून त्यांनी अवघ्या विश्वाला शून्याची भेट दिली अन् आता सारं जग त्या शून्याचा मागेपुढे गोल गोल फिरू लागलं. इथं त्यांचा नातू चांगदेव याने ज्योतिषीय खगोलीय वेधशाळा उभारली ती हीच वेधशाळा आहे.आता खान्देश प्रांतात प्रवेश करताना,डोंगर उतरतांना संपूर्ण देह खाली ओढल्यासारखा भास होत होता. अत्यंत कठीण खाचखळगे ओलांडून व दोन कि.मी.घनदाट जंगल पार करून पाटणा देवीच्या मंदिरात पोहचलो व दर्शन करण्यासाठी रांगेत उभे राहिलो. गर्दीत रांगेत मंदिरात उभे असतांना मागून एक दोन महिला घुमत घुमत मंदिरात आल्या.त्यांच्या मागे दोन-चार माणसे होती ते सर्व सर्वांच्या आधी दर्शन घेऊन बाहेर पडले तासनतास रांगेत उभे असलेले एक सद्गृहस्थ, देवीचे भक्त यांना या घटनेचा फार राग आला ते म्हणाले की," मी उभं आयुष्य चंडिकादेवी मातेची सेवा केली पण देवी कधी अंगात आली नाही अन् या बायांच्या अंगात येतेच कशी? खरंतर रांगेत उभे राहून दर्शन घेण्यासाठी खूप वेळ थांबावं लागतं म्हणून लवकर दर्शन करण्यासाठी त्यांनी हा मध्यम मार्ग स्वीकारला आहे कारण दर्शन घेऊन बाहेर पडल्या बरोबर या महिलांच्या अंगातील देवी बाहेर जातेच कशी?"हे सगळे चित्र पाहून आणि दर्शन घेऊन आम्ही बाहेर पडलो.मंदिर परिसरात ओढ्याला पाणी वाहत होते तिथं हात पाय धुवून परतीच्या प्रवासाला निघालो.आता दोन अडीच वाजेच्या दरम्यानच्या काळात डोईवर ऊन तापलं होतं. समोर इतका मोठा काळाशार पहाड पाहून छातीवर दबाव येऊ लागला व हा भला मोठा पहाड चढून वर जाणे खूप कष्टाचे आहे याची जाणीव झाली.डोंगर चढताना उष्णतेमुळे खूप त्रास होत होता.कासरा दोन कासरे चालून जीव थकत होता.हृदयाची धडधड खूप वेगाने वाढत होती पण रस्ता कसा का असेना तो पार केल्याशिवाय पर्याय नव्हता. थांबून चालणार नव्हते.प्रवास तर करावाच लागणार होता.मग वाट कितीही अवघड असली तरी..म्हणून हळूहळू आम्ही पितळखोऱ्याच्या दिशेने वाटचाल करू लागलो.अर्धा डोंगर चढून झाल्यानंतर वाऱ्याची थंडगार झुळूक अंगाला लागून घाम अंगात जिरला व जरा हायसे वाटले अन् खरंच खूप उष्णता असते खान्देशात असे सर्व जण म्हणू लागले.आता तहानेने जीव व्याकूळ झाल्याने सकाळी वाटेत ज्या ठिकाणी पाणी वाहत होते तिथं पोहचून पाणी पिल्यानंतर थोडं बरं वाटू लागलं.आम्ही खूप थकलो होतो म्हणून थोडा विसावा घेऊन पुढील प्रवासाला सुरुवात केली. एक दीड किलोमीटर चालल्यानंतर पितळखोरा लेण्या हळूहळू नजरेस पडू लागल्या. तोपर्यंत दुपारचं तळपणारं ऊन ओसरलं होतं आणि सायंकाळी मावळतीची चाहूल लागली होती. लेणीच्या अंगावर मावळत्या सूर्याचे पिवळेधम्मक किरण पडून संपूर्ण परिसर जणू सोन्याने न्हाऊन निघाला होता. काळ्या दगडात कोरलेल्या त्या भव्य लेण्या त्या सुवर्णकिरणांत अधिकच तेजस्वी दिसत होत्या.जणू हजारो वर्षांच्या इतिहासाला सूर्यकिरणांनी पुन्हा एकदा उजाळा दिला होता.डोंगरांच्या कपारीतून अलगद उतरणारा सूर्य, आकाशात पसरलेली केशरी-तांबडी छटा आणि त्या पार्श्वभूमीवर उभ्या असलेल्या लेण्या..हा नजारा इतका मनमोहक होता की काही क्षण आम्ही स्तब्ध उभे राहिलो. थकलेल्या पावलांना जणू नवसंजीवनी मिळाली. दिवसभराच्या कष्टानंतर ही दृश्यसंपदा म्हणजे निसर्गाने दिलेली सुंदर भेटच होती.लेण्यांच्या भिंतींवर पडणाऱ्या सूर्यकिरणांनी विविध आकृत्या निर्माण केल्या होत्या. खांबांच्या सावल्या जमिनीवर लांबच लांब पसरल्या होत्या. त्या सावल्यांमध्ये इतिहासाची गूढता दडलेली भासत होती. जणू त्या खांबांनी आणि दगडांनी हजारो वर्षांचा प्रवास पाहिला होता.. राजे, साधू, भिक्षू आणि प्रवाशांचे येणे-जाणे अनुभवले होते. त्या साक्षीदारांपुढे उभं राहिल्यावर आपण किती क्षुल्लक आहोत, याची जाणीव मनाला होत होती. आम्ही थोडा वेळ लेण्यात थांबल्यानंतर मनोमन भगवान बुद्ध यांना वंदन करून बाहेर पडलो. असीम शांततेचा अनुभव देणारी ही भ्रमंती मनात कायमची कोरली गेली. पुन्हा एकदा या लेण्यांच्या सान्निध्यात यायचे.ही इच्छा मनात घेऊन आम्ही घरी परतलो.

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी NSUI चा निर्धार!




**छत्रपती संभाजीनगर :** येथे NSUI च्या माध्यमातून महाराष्ट्र प्रदेश महासचिव ॲड. सुभाष गावित यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी भव्य धरणे आंदोलन यशस्वीरीत्या पार पडले.गांधी भवन ते जिल्हाधिकारी कार्यालय असा निर्धारपूर्ण व शिस्तबद्ध मोर्चा काढत प्रशासनाचे लक्ष विद्यार्थ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे वेधण्यात आले. या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. शादाब शेख, NSUI जिल्हाध्यक्ष अभिषेक शिंदे तसेच अनेक पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.यानंतर मा. जिल्हाधिकारी कार्यालयात प्रतिनिधी मंडळासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या आणि मागण्या ठामपणे मांडण्यात आल्या. मा. जिल्हाधिकारी यांनी या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत तातडीने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.परंतु, जर विद्यार्थ्यांच्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावल्या नाहीत, तर NSUI च्या वतीने विधानसभेवर तीव्र घेराव आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट आणि ठाम इशारा प्रशासनाला देण्यात आला.विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहील!

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६


## कसं हे जगणं

कसं हे जगणं! उन्हात तळणं!<br>मातीत मळणं! लिहिलेलं!!

घामाच्या पुरात! भिजलंय रान!<br>जगण्याचं दान! कोरडच!!

स्वप्नांचा कागद! बुडाला पुरात!<br>वेदना उरात! खोलंबली!!

आलंय भरून! डोळ्यात आभाळ!<br>गळ्यातली माळ! सुकलेली !!

सुटता सुटेना! आशेची ही गाठ!<br>लागलीया वाट! आयुष्याची!!

किती सोसायचं! जन्मास येऊन!<br>काटे पांघरुण! निघायचं!!

**ज्ञानेश्वर गायके,**<br>**कन्नड**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# महिलांचे प्रश्न, स्वप्न आणि दिशा

**“स्त्री”** हा शब्द जरी लहान असला, तरी तिच्या सामर्थ्याची व्याप्ती आकाशाएवढी आहे. ती आई आहे, मुलगी आहे, पत्नी आहे, बहीण आहे; पण या सगळ्या नात्यांपलीकडे ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिची स्वतःची स्वप्नं आहेत, तिचे विचार आहेत, तिच्या आकांक्षा आहेत. तरीही अनेकदा तिच्या स्वप्नांना परिस्थितीची, समाजाच्या चौकटीची आणि कधी कधी घरातीलच मर्यादांची जखडण बसते.आजही अनेक महिलांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो. काहींना लहान वयातच जबाबदाऱ्या घ्याव्या लागतात. काहींना घर आणि नोकरी यामध्ये संतुलन राखताना स्वतःसाठी वेळच मिळत नाही. अनेक वेळा ती स्वतःच्या इच्छांना बाजूला ठेवते, कारण तिला वाटतं “माझ्यापेक्षा कुटुंब महत्त्वाचं.” तिचा त्याग कोणी मोजत नाही, पण तिच्या कष्टांवरच घराची पायाभरणी उभी असते.आजही अनेक महिलांना मानसिक दबावाचा सामना करावा लागतो. ती कितीही कष्ट करत असली, तरी तिच्या कामाची दखल घेतली जात नाही. घरातील काम हे “कर्तव्य” समजलं जातं, पण त्यामागची मेहनत, थकवा आणि भावनिक ताण याकडे फारसं कोणी लक्ष देत नाही. अनेक वेळा तिच्या मताला फारसं महत्त्व दिलं जात नाही. निर्णय घेताना तिचं अस्तित्व दुय्यम ठरतं. हळूहळू ती स्वतःच स्वतःला कमी समजू लागते आणि हाच सर्वात मोठा अन्याय आहे. कारण जी स्त्री संपूर्ण कुटुंब उभं ठेवते, तिच्या आत्मसन्मानालाच जर धक्का बसला, तर ती आतून तुटते.तसेच ग्रामीण भागात किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये महिलांना अजूनही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. शिक्षण अर्धवट राहणं, लहान वयात लग्न होणं, स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणं हे प्रश्न अजूनही वास्तव आहेत. पण या सगळ्यातही ती हार मानत नाही. तिच्या डोळ्यांत एक आशा असते “माझ्या मुलीचं आयुष्य मात्र वेगळं असावं.” तिची हीच भावना समाज बदलण्याची सुरुवात आहे. कारण प्रत्येक आई आपल्या मुलीला उंच भरारी घेताना पाहू इच्छिते, आणि त्या स्वप्नातूनच नवा समाज घडतो.पण या सगळ्या प्रश्नांमध्येही एक गोष्ट कायम असते तिच्या मनातलं स्वप्न. ते कधी शिक्षणाचं असतं, कधी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचं, कधी एखाद्या कलेत नाव कमावण्याचं. अनेकदा ती शांतपणे सगळं सहन करते, पण तिच्या मनात एक आवाज असतो “एक दिवस मी नक्की काहीतरी करेन.”मला एक साधं उदाहरण आठवतं. एका छोट्या गावातली एक महिला, जिला पुढे शिकायची खूप इच्छा होती. पण घरची परिस्थिती बेताची. लग्न लवकर झालं. मुलं, घर, जबाबदाऱ्या सगळं तिच्यावर. पण तिनं स्वप्न सोडलं नाही. मुलं मोठी झाल्यावर तिनं पुन्हा शिक्षण सुरू केलं. आज ती स्वतःच्या पायावर उभी आहे आणि इतर महिलांनाही मार्गदर्शन करते. तिच्या चेहऱ्यावरचं समाधान हेच सांगतं स्वप्नांना वय नसतं, फक्त धैर्य लागतं.आजची स्त्री बदल स्वीकारते आहे. ती शिकते आहे, निर्णय घेते आहे, स्वतःचा आवाज उठवते आहे. पण अजूनही तिला योग्य दिशा, प्रोत्साहन आणि विश्वासाची गरज आहे. जेव्हा कुटुंब तिच्या पाठीशी उभं राहतं, तेव्हा ती अशक्य वाटणारी गोष्टही शक्य करून दाखवते. तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणं हीच तिच्यासाठी सर्वात मोठी ताकद आहे.महिलांचे प्रश्न केवळ वैयक्तिक नाहीत, ते सामाजिक आहेत. म्हणूनच बदलही सामूहिक असायला हवा. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता दोघांनाही समान संधी देणं, महिलांना शिक्षण आणि स्वावलंबनाची दारे उघडी ठेवणं, त्यांच्या निर्णयांचा आदर करणं हीच खरी प्रगतीची दिशा आहे.पण या सगळ्यात सर्वात महत्त्वाचं म्हणजे महिलांनी स्वतःवर विश्वास ठेवणं. कारण तिच्या मनात जर आत्मविश्वासाची ज्योत पेटली, तर ती स्वतःचा मार्ग स्वतः तयार करू शकते. अपयश आलं तरी ती पुन्हा उभी राहू शकते. कारण स्त्री ही केवळ सहनशील नाही, तर ती जिद्दी आहे, सक्षम आहे, आणि परिवर्तन घडवणारी शक्ती आहे.आज प्रत्येक महिलेच्या मनाला एकच हाक द्यावीशी वाटते तुमच्या स्वप्नांना कमी लेखू नका. परिस्थिती कठीण असली तरी तुमची ताकद त्याहून मोठी आहे. स्वतःला ओळखा, स्वतःवर प्रेम करा आणि धाडसाने पुढे पाऊल टाका.कारण जेव्हा एक स्त्री पुढे जाते, तेव्हा फक्त तिचं आयुष्य बदलत नाही तिच्यासोबत संपूर्ण कुटुंब, समाज आणि पुढची पिढी उजळून निघते.महिलांचे प्रश्न आहेत, पण त्याहून मोठी त्यांची स्वप्नं आहेत; आणि जेव्हा त्या स्वप्नांना योग्य दिशा मिळते, तेव्हा त्या केवळ स्वतःचं नव्हे तर संपूर्ण समाजाचं भविष्य घडवतात.




**कु . रजनी कैलास गारघाटे**<br>मो.नं :- ९०७५१९६३९३<br>वणी


# गणेश टेकडीवरील शिवमहापुराण सोहळ्यात १०८ महंत नीलकंठ महाराजांचे प्रेरणादायी प्रवचन



**चिंचोली लिंबाजी (प्रतिनिधी)** : कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी गावालगत असलेल्या विघ्नहर्ता गणेश मंदिर, गणेश टेकडी येथे सुरू असलेल्या शिवमहापुराण सोहळ्यात आज पाचव्या दिवशी भाविकांना आध्यात्मिक संदेश देण्यात आला. राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रम, नवनाथगड सुरमाळ (उत्तर) येथील अधिकारी १०८ महंत नीलकंठ महाराज यांच्या प्रवचनाने सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. महाराजांचे व्यासपीठाकडे आगमन होताच संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. एक तास चाललेल्या प्रवचनात १०८ महंत नीलकंठ महाराज यांनी नामस्मरणाचे आध्यात्मिक व जीवनातील महत्त्व विशद केले. तसेच गणपती बाप्पाच्या सेवेचे महत्त्व सांगत भक्ती, श्रद्धा आणि सात्त्विक जीवनाचा मार्ग अवलंबण्याचा संदेश दिला.या शिवमहापुराण सोहळ्यास परिसरातील तसेच दूरदूरहून आलेले हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर १०८ महंत वाल्मीक गिरी महाराज यांचीही उपस्थिती लाभली. सोहळ्यामुळे संपूर्ण गणेश टेकडी परिसरात भक्तीमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६

## परळी महा पशूधन एक्स्पोचे उद्घाटन; पंकजा मुंडेंच्या हस्ते, 14 फेब्रुवारीला फडणवीस उपस्थित



**बीड (भगवंत पाळवदे) :** परळी येथे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच आयोजित करण्यात आले आहे. या पशू प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी १३ फेब्रुवारी रोजी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी पशुधन एक्स्पोला भेट देणार आहेत.शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान 'अखिल भारतीय पशुपक्षी महा पशुधन एक्स्पो प्रदर्शनाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू पाहण्यास मिळणार असून प्रदर्शनाच्या तयारीला सध्या वेग आला आहे.मुख्यमंत्री १५ ऐवजी १४ तारखेला परळीतमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदर्शनाच्या समारोपाला म्हणजे रविवारी १५ तारखेला येणार होते, परंतु ते आता शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. येणार आहेत.पशुप्रदर्शन ऐतिहासिकया प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे.हा अत्यंत सुंदर योगायोगमहाशिवरात्र आणि महा पशुधन एक्सपो हा अत्यंत सुंदर योगायोग आहे. परळीत असे प्रदर्शन व्हावे अशी माझी इच्छा होती. नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.

## स्व. अजितदादांच्या स्वप्नातील जिल्हा घडविण्यासाठी कटिबध्द - पालकमंत्री सुनेत्रा पवार



**बीड (भगवंत पाळवदे) :** बीड जिल्ह्याचा पुणे, पिंपरी चिंचवड आणि बारामतीसारखा विकास करण्याचे स्वप्न उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी उराशी बाळगले होते. त्यांच्या या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी सर्व अधिका-यांनी व यंत्रणेने काम करावे असे भावनिक आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज जिल्हा नियोजन समितीच्या सभेत केले. या बैठकीत सन २०२६-२०२७ चा आराखडा सादर करण्यात आला व चालू आर्थिक वर्षाच्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. चालू आर्थिक वर्षात ५७५ कोटींचा नियतव्यय प्राप्त असून यातील ५६५ कोटी ४१ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.आज दूरदृश्य संवाद प्रणालीव्दारे झालेल्या या बैठकीस पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, नमिता मुंदडा, यांची मुंबईतुन तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर आदींची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मुंबईत याबाबतचे सादरीकरण केले. जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यावेळी उपस्थित होते. बैठकीत प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा परिचय देणारी चित्रफित दाखवण्यात आली. माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी यावेळी शोकप्रस्ताव मांडला. याप्रसंगी सर्व लोकप्रतिनिधींनी आपापल्या भावना व्यक्त केल्या. यानंतर सभागृहात दोन मिनिटे मौन पाळून स्व. अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. दुरदृश्य प्रणालीव्दारे जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची उपस्थिती होती. अत्यंत भावूक वातावरणात झालेल्या या सभेस बीड येथील सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांना बीड जिल्हयाविषयी विशेष ओढ होती. या जिल्हयाचा कायापालट करण्याचा निर्धार त्यांनी केला होता. जिल्ह्याचा विकास करण्याचे त्यांचे ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी अधिका-यांनी एकदिलाने आणि प्रमाणिकपणे काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी या प्रसंगी केले. त्यांची विकासगंगा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल, असे त्या म्हणाल्या. यावेळी कामकाजाचा आढावा सादर करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की, सन २०२५-२०२६ साठी मंजूर नियतव्यय सर्वसाधारण गटासाठी ५७५ कोटी रूपये इतका आहे. यातील ५६५ कोटी ४१ लक्ष रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून १९९ कोटी ६४ लक्ष इतकी रकम खर्च झाली आहे. हे प्रमाण नियतव्ययाच्या ३४.७२ टक्के इतके आहे.अनूसुचित जाती योजनेंतर्गत १२९ कोटी नियतव्यय असून प्रशासकीय मान्यता ८१ कोटी ५७ लक्ष आहे. हे प्रमाण ५२.२० टक्के इतके आहे.जिल्हा वार्षिक योजना ओटीएसपी अंतर्गत २ कोटी ३९ लक्ष रुपये निधी प्राप्त झालेला असून २ कोटी १९ लक्ष रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ६१ लक्ष रुपये खर्च झालेले आहे. खर्चाची टक्केवारी २५.६९ टक्के इतकी आहे. या बैठकीत सन २०२६-२०२७ चा प्रारुप आराखडा सादर करण्यात आला. यंदा नियोजन विभागातर्फे ४८१ कोटी ६२ लक्ष कमाल आर्थिक नियतव्यय निर्धारित करुन दिला आहे. त्यानुसार आराखडा नियोजन करण्यात आला असून आज तो बैठकीत सादर झाला. यानंतर जिल्हयाच्या वतीने दुपारी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तर बैठकीत तो सादर करण्यात आला. यात अतिरिक्त निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीने केली आहे.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903

जाहिरात दर
१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-